आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.३१

# व्यसनाधीनतेच्या विळख्यातून विद्यार्थ्यांच्या शालेय समायोजनात शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Role of School Leadership in School Adjustment of Students with Addiction Disorders

**प्रस्तावना –**

एक चांगली शैक्षणिक संस्था अशी असते की, ज्यात प्रत्येक विद्यार्थ्याला आपण स्वागतार्ह असल्याची तसेच स्वतःची दखल घेतली जात असल्याची प्रबळ भावना असते, एक सुरक्षित आणि प्रेरणादायी वातावरण अस्तित्वात असते, सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध प्रकारचे अध्ययन अनुभव उपलब्ध करून दिले जातात आणि चांगल्या भौतिक पायाभूत सुविधा व अध्ययनासाठी अनुकूल संसाधने सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जातात. या सर्व सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करणे प्रत्येक शैक्षणिक संस्थांचे ध्येय असते. असे शैक्षणिक धोरण 2020 च्या तत्त्वांमध्ये नमूद केलेली आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या विविध क्षमता ओळखून त्या क्षमतांना चालना देवून त्या वृद्धिंगत करणे गरजेचे आहे. हे सर्व करताना शालेय वातावरणात, अध्यापनात येणाऱ्या विविध समस्या जाणून घेऊन मुलांचे शालेय समायोजन साधणे महत्त्वाचे ठरते.

काही महिन्यांपासून अधिक काळ सारे जग कोरोना या शब्दाभोवती फिरते आहे. पण कोरोनाहुन अधिक मृत्यू होणा-या, अनेकांचे आयुष्य, संसार उद्धवस्त करणा-या आणि पिढ्यानपिढ्या चालत आणि आता धावत असलेल्या व्यसनाधीनते कडे म्हणावे तितक्या गांभीर्याने पाहिले जात नाही ही खंत आहे. व्यसनांच्या नव नवीन त-हा व नव नवे मार्ग, अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून अंमली पदार्थाचे सेवन करण्याची सुरु झालेली पध्दत आता व्यसन बनली आहे. पुणे, मुंबई, नवी मुंबई हे एज्यूकेशनल हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात आता नव नवे अंमली पदार्थांचा शिरकाव झाल्याचे दिसून येत आहे.

ठाणे जिल्ह्यात काम करत असताना विविध प्राथमिक व माध्यमिक शाळांना भेटी दिलेल्या आहेत. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी विविध उपक्रमाबद्दल, विद्यार्थ्यांच्या प्रगती, करिअर,वर्तन बद्दल याबाबत चर्चा करताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आलेली आहे की कमी अधिक प्रमाणामध्ये विद्यार्थी विविध व्यसनाला बळी पडत आहेत आणि त्याचा मोठा परिणाम शाळेवर व विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होत आहे. विद्यार्थ्यांनी या व्यसनातून बाहेर पडून चांगले शिक्षण घ्यावे व त्यांचे शालेय समायोजन साधावे यासाठी काम करणाऱ्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास या मोड्युल अंतर्गत करण्यात आलेला आहे.

**व्यसनाधीनता संकल्पना –**

एखाद्या गोष्टीचं व्यसन जडते म्हणजे नेमक काय होतं. याच उत्तर कोणा कडेच नाही. एखादी व्यक्ती सतत दारु पिते, धुम्रपान करते म्हणजे ती व्यसनी आहे. असा सर्वसाधारणपणे विचार प्रचलित आहे. यामुळे त्या व्यक्तीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. व्यसन या शब्दा बद्दल अनेक गैरसमज असतात. नेमकं तथ्य काय हे समजणे महत्त्वाचे आहे. एखादी गोष्ट आपण छंद म्हणून जोपासते परंतु तीच गोष्ट वारंवार करण्याची गरज भासणे किंवा त्याच्या आहारी जाणे मग ती व्यसन असो की कुठलीही सवय नकळत करणे म्हणजे व्यसन होय. व्यसनी व्यक्तीला स्वतःच्या इच्छा शक्तीच्या जोरावर व्यसनावर मात करता येते .

नशा देणाऱ्या पदार्थाने किंवा मादक पदार्थाच्या सेवनाने मानवी शरीराच्या मज्जा संस्थावर परिणाम होऊन गुंगी/नशा/निंद्रा येणे शरीरांचे अवयव शिथिल पडणे ग्लानी येणे, विचार शक्तीचा -ह्रास इत्यादी प्रकार घडतात. मात्र मादक पदार्थाच्या सेवनाने मनावरील दडपण निघून जाते. किंवा कमी होते. या मादक पदार्थ, द्रव्याची नंतर शरीराला सवय लागते. अशा पदार्थांचे वारंवार सेवन करण्याची तीव्र इच्छा म्हणजे व्यसन होय.






मोबाईल चे व्यसन

आजच्या परिस्थितीचा विचार करता व्यसनांचे नवनवीन प्रकार समोर आले आहे. यामध्ये दारु, गांजा, अफू,तंबाखू, ताडी, बिडी, सिगारे, ईसिगारेट, ब्राऊन शुगर, भांग, मॉर्फीन, हशिश, हेरोईन हे व्यसन मोठ्या प्रमाणात केले जाते.यासोबतच व्हाईटनरचा वास घेणे, पेट्रोलचा वास घेणे, आयोडेक्स ब्रेडला लाऊन खाणे. विविध नशेच्या गोळया घेणे. ड्रग्सचे प्रकार युवकां मध्ये घेण्याचे प्रमाण वाढत आहे. यासोबत सोशल मिडीया हे व्यसन हल्ली खुप वाढलेले आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटस्अप याचा वापर लहान मुलापासून मोठ्या व्यक्ती मध्ये मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे.

राज्यघटनेतील अनुच्छेद 47 मध्ये सार्वजनिक आरोग्य आणि जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजनाव्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यानुसार राज्याचे व्यसनमुक्ती धोरण निश्चित करण्यात आले असून या विभागाच्या दिनांक 17 ऑगस्ट 2011 च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्राने सन 1987 पासून अमली पदार्थ हा विषय महत्वाचा मानला आहे. भारतात नार्कोटिक ड्रग्स ॲण्ड सायकोट्रॉपिक सबटंन्स ॲक्ट 1985 (एनडीपीएस) हा अंमली पदार्थ विरोधी कायदा आहे. मालद्वीप सरकारने संयुक्त राष्ट्रांना मादक पदार्थांच्या संबंधित संमेलनासाठी अनुमोदन दिले आणि पहिले अंमली पदार्थावर आधारित संमेलन 1961 ला झाले. दुसरे संमेलन 1971 मध्ये अवैध सायकोट्रापिक पदार्थ यावर झाले. अवैध व्यवसायाच्या विरोधात 1988 मध्ये तिसरे संमेलन झाले.

या कायद्यांतर्गत अमली वस्तू किंवा औषधाचे उत्पादन, वितरण, सेवन, विक्री, वाहतूक, साठा, वापर, आयात-निर्यात यावर देशात बंदी आहे. प्रत्येक व्यक्ती, मुले, मुली यांच्यामध्ये जनजागृती व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या सामाजिक व विशेष साहाय्य विभागाने उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. राज्यात जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी यांनी 26 जून-जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन असल्याने या दिवशी आपल्या परिसरातील शाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करायचे आहे. गावात/शाळामधून अमली पदार्थ विरोधी फेरी काढणे, अमली पदार्थावर बंदी याविषयी निबंध स्पर्धा आयोजित करणे, व्यसनमुक्ती हीच राष्ट्रभक्ती याविषयी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, अमली पदार्थावर पथनाट्याचे आयोजन करणे, अमली पदार्थ विरोधी जनजागृती करणे, अमली पदार्थाच्या सवयी सोडविण्यासाठी या दिवशी निर्धार प्रतिज्ञा देणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावेत असे सूचित करण्यात आले आहे.म्हणूनच शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना या सर्व बाबी समजणे व त्यातून त्यांनी स्वतःवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.यात शाळा,मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांच्या भूमिका खूप महत्वाच्या आहेत.

**मोडयूल अध्ययनाची उद्दिष्टे**

1. व्यसनाधीनता ही संकल्पना समजून घेणे.
2. व्यसनाधीनतेची समस्या असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांचे यशस्वीपणे समायोजन करणाऱ्या शालेय नेतृत्वाच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
3. व्यसनाधीनतेची समस्या असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समायोजनाबाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**व्यसनाधीन विद्यार्थ्यांबाबत नेतृत्वासमोर असलेली आव्हाने**

व्यसनामुळे मुलांमध्ये सतत चिडचिड होणे, आपल्यावर अन्याय होतो आहे असे वाटणे, काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर या विकारांचे प्रमाण वाढणे. एकलकोंडेपणा, अनामिक भीती, वैफल्यग्रस्तता, संशय, आपल्याला कोणी समजून घेत नाही अशी भावना निर्माण होणे. अशा विविध मानसिक व्याधी बरेचदा मुलांना व्यसनामुळे दिसून येतात . त्याचबरोबर मुलांच्या मनामध्ये नकारात्मकता निर्माण होते. मुले मारामारी तसेच गुंड प्रवृत्ती कडे वळतात. या सर्व बाबींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनावर होतोच. तसेच विद्यार्थी शाळेपासून दूर होतात. अशावेळी त्यांचे व्यसन कमी करून शालेय समायोजन साधणे हे शाळा, मुख्याध्यापक व शिक्षकांना खूपच आव्हानात्मक असते.

**विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने**

- विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेच्या विळख्यातून बाहेर काढून शालेय प्रक्रियेत त्यांचे समायोजन साधणे हे एक आव्हान असते.
- विद्यार्थ्यांच्या वर्तन विषयक समस्या सोडविणे त्याबाबत उपचारात्मक मार्गाचा अवलंब करून त्यांचे समुपदेशन करणे.
- व्यसनाधीन मुले व इतर मुले यांच्यात सामाजिक समतोल साधून शालेय शिस्त राखणे.
- विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढवून अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तसेच विविध उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग घेणे.
- विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर करून त्यांचे शालेय प्रक्रियेत समायोजन साधणे.

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने**

- व्यसनाधीन मुलांबाबत शिक्षकांच्या मनामध्ये असलेली घृणा, राग व दडपण कमी करून या मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे.
- व्यसनाधीनता कमी करण्यासाठी आयोजित केलेल्या विविध उपक्रमात शिक्षकांना समाविष्ट करून घेणे.
- विद्यार्थ्यांचे शालेय प्रक्रियेत समायोजन साधण्यासाठी शालेय नेतृत्वास सहकार्य करणे.
- पालक,विद्यार्थी यांचेसोबत शिक्षकांचा संवाद फलदायी होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे

**पालकांशी संबंधित आव्हाने**

- बहुतांशी वडील पालक स्वतः व्यसनाधीन असल्यामुळे त्या पालकांना त्यांच्या मुलाबाबत मार्गदर्शन करणे कठीण असते.
- पालक स्वतः व्यसनाधीन असल्यामुळे विविध उपक्रमात व कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग घेणे हे आव्हान असते.
- एकल पालक,अनाथ मुले,आई वडिलांऐवजी इतर नातेवाईक यांच्याकडे राहणारी मुले,अवैध व्यवसायातील पालक,व्यसनाधीन पालक यांचेसोबत समायोजन व संवाद आव्हान असते.

**समाजाशी संबंधित आव्हाने**

- व्यसनग्रस्त मुलांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन काहीसा नकारात्मक असतो.
- व्यसनाधीन मुलांमुळे आपली मुले बिघडतील ही भावना असल्याने इतर पालक किंवा समाजातील व्यक्ती आपल्या मुलांना सोबत शिकवण्यास पाठविण्यास नकार देतात.
- शाळांमध्ये विविध सभांना व कार्यक्रमात सर्व समाजाचे व पालकांचे सहकार्य फार कमी दिसून येते.

**यशोगाथा**

**नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा क्रमांक 107 तुर्भे**

**मुख्याध्यापकाचे नाव : श्रीमती विजया विलास ठाकूर**

नवी मुंबई हे नियोजित व विकसित शहर असून त्यातील झोपडपट्टीचा व अविकसित भाग म्हणजे तुर्भे होय. या भागात मोठ्या प्रमाणावर भारतातील इतर प्रांतातून आलेले लोक राहतात. सर्वसाधारण ही लोक मजूर, बिगारी काम, घर काम तसेच आजूबाजूच्या चिकन/मटन शॉप मध्ये काम करतात. आर्थिक स्तर निम्न असून ते बऱ्याचदा व्यसनाच्या अधीन असतात. अशा पालकांची मुले शिक्षण घेण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत येतात.

श्रीमती विजया ठाकूर यांनी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक 117 दिवाळे, बेलापूर येथे जवळजवळ दहा वर्ष काम केल्यानंतर त्यांची मार्च 2022 मध्ये मुख्याध्यापक या पदावर पदोन्नतीने तुर्भे शाळेत नेमणूक झाली. श्रीमं.ठाकूर यांनी यापूर्वी दिवाळे येथील शाळेमध्ये पण मुलांच्या वर्तनाबाबत आणि विविध समस्या संदर्भामध्ये काम केलेले आहे.

ठाकूर मॅडम यांनी शाळेत रुजू झाल्यानंतर शाळेतील एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांना विद्यार्थ्यांच्या वर्तनाबाबत अनेक समस्या जाणवल्या. तसेच त्याबाबत शिक्षक व इतर विद्यार्थ्यांनी अनेक तक्रारी केल्याचे दिसून आले. मार्च 2020 पासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बहुतेक शाळांमध्ये ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा वापर सुरू केला. त्याचप्रमाणे या शाळेतही ऑनलाइन पद्धतीने मुलांना शिक्षण दिले गेले होते. त्याचाच परिणाम म्हणून बहुतांशी विद्यार्थ्यांकडे मोबाईल दिसून येत होते. विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला व विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे काही दिवस निरीक्षण केल्यानंतर त्यांना खालील बाबी प्रकर्षाने आढळून आल्या. विद्यार्थी विविध व्यसनाच्या विळख्यात अडकलेले होते. फक्त विडी, दारू, गुटखा, हुक्का याचाच व्यसन नसून सोशल मीडियाचाही सर्रासपणे अतिवापर केला जात होता. ई सिगारेट या आधुनिक तंत्राचा वापर करून विद्यार्थी नशा करत होते. तसेच नशा साठी मुले एका विशिष्ट प्रकारच्या एनर्जी ड्रिंक चा वापर करत होते. या समस्येबरोबर इतर पूरक अनेक समस्या त्यांना आढळून आल्या.




**नशा येणारे एनर्जी ड्रिंक व ई सिगारेट**

**इतर समस्या**

1.विद्यार्थी वर्गामध्ये मोबाईलचा सर्रास वापर करत होती. बहुतेक मुलांकडे मोबाईल असल्याचे दिसून आले.

2. विद्यार्थी वैयक्तिक तथा गटांमध्ये मारामारी करत होते. विद्यार्थ्यांव्यतिरिक्त त्यांच्या परिसरातील इतर मुलेही मारामारीसाठी येत होती.

3. विद्यार्थ्यांची शाळेमध्ये उपस्थिती अनियमित होती. इतर मुलांबरोबर ते बाहेर फिरताना दिसत होते

4.अनेक वडील पालक तर काही माता पालक सुद्धा व्यसनाधीन असल्याचे दिसून आले. त्याचबरोबर त्यांना त्यांच्या मुलांच्या शालेय व सामाजिक वर्तनाबाबत उदासीनता दिसून आली.

5. विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती बेताची होती. बहुतेक विद्यार्थ्यांना तीन ते चार भावंडे होती.

6. विद्यार्थ्यांचे शिक्षण व करिअर बाबत निश्चित असे ध्येय दिसून येत नव्हते. विद्यार्थी पालकांसोबत काही ठिकाणी कामासाठी जात होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीही कमी होत असल्याचे दिसून आले.

7. फक्त नववी किंवा दहावीचे विद्यार्थी नाहीत तर त्याच परिसरात असलेल्या प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवी-आठवीचेही विद्यार्थीही विविध व्यसन करताना दिसून आले.

व्यसनाधीनता या समस्येबरोबर वरील इतर समस्याबाबतही शिक्षक व इतर पालकांनी तक्रारी केलेल्या होत्या. हे पाहून त्यांचे मन हेलावून गेले. विद्यार्थ्यांची व्यसनाधीनता कमी करण्याबरोबर त्यांना पूरक असलेल्या विविध समस्यांवर आपल्याला काम करावे लागेल असे त्यांना जाणवले व त्या दृष्टिकोनातून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली.

त्याच परिसरात असलेल्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व त्यांच्या शाळेतील शिक्षक यांना हाताशी धरून तसेच काही स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने त्यांनी खालील विविध उपक्रम राबविण्यात

सुरुवात केली. या उपक्रमात त्यांनी त्यांच्या परिसरातील प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनाही समाविष्ट करून घेतले.

**शाळेत राबविण्यात आलेले विविध उपक्रम**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | तपशील |
|---|---|---|
| 1. | मारामारी व हिंसक प्रवृत्तीला आळा बसण्यासाठी-पेट्रोलिंग | एपीएमसी पोलीस स्टेशन तुर्भेमार्फत शाळा सुटल्यानंतर गेट बाहेर समाज विघातक घटकांच्या प्रादुर्भावावर आळा बसविण्यासाठी काही दिवस पेट्रोलिंग करण्यात आले.<br>पेट्रोलिंग करण्यात आल्यामुळे विद्यार्थी व इतर बाहेरील मुले यांच्यात होणाऱ्या मारामारीवर आळा बसला व त्यांचे शाळेसमोर फिरणे बंद झाले. |
| 2. | सोशल मीडियाचा प्रभाव कमी करण्यासाठी-मार्गदर्शनपर कार्यशाळा | विद्यार्थ्यांवरती सोशल मीडियाचा असलेला प्रभाव लक्षात घेऊन एपीएमसी पोलीसांमार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आला त्या कार्यशाळेत पोक्सो, लैंगिक शिक्षण, सायबर सिक्युरिटी, सोशल मीडियाचे दुष्परिणाम अशा विविध विषयांच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.<br>याबाबत घेण्यात आलेल्या विविध कार्यशाळांमुळे मुलांमध्ये मोबाईल तसेच सोशल मीडियाचा वापर कमी झाला. विद्यार्थ्यांचे शाळेत मोबाईल आणण्याचे प्रमाण कमी झाले. |
| 3. | बिडी,सिगारेट, तंबाखू, दारू इ. बाबत जागृती करण्यासाठी-जीवनकौशल्य कार्यशाळा | शाळेत नशा येणारे एनर्जी ड्रिंक व ई सिगारेट आणण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते त्यासाठी विविध स्वयंसेवी संस्थां व नशा मुक्ती केंद्र यांना यांच्याशी समन्वय साधून जीवन कौशल्यावर आधारित विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेत त्यांना या व्यसनांच्या परिणामाबाबत जागृत करण्यात आले.<br>या कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये या व्यसनाबाबत जाणीव जागृती निर्माण होवून विद्यार्थ्यांचे शाळेत नशा येणारे एनर्जी ड्रिंक तसेच ई सिगारेट आणण्याचे व घेण्याचे प्रमाण कमी झाले. |
| 4. | शॉर्ट फिल्म व व्हिडिओ चे प्रक्षेपण | शाळेतील व्हर्चुअल क्लासरूम चा वापर करून मुलांना व्यसनाधीनताच्या दुष्परिणाम बाबत शॉर्ट फिल्म व व्हिडिओ दाखवण्यात आले.<br>त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनता बाबत जागरूकता निर्माण झाली. व त्याचा सकारात्मक परिणाम व्यसन कमी करण्यावर झाला. |
| 5. | करिअर व अंधश्रद्धा या विषयावर व्याख्यान | अंधश्रद्धा निर्मूलन समितीद्वारे करिअर व अंधश्रद्धा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. |
| 6. | प्रौढ साक्षरता वर्गाचे आयोजन | शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी प्रौढ साक्षरता वर्गाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये पालकांना प्राथमिक लेखन व वाचन संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. |
| 7. | आरोग्य तपासणी | जिल्हा आरोग्य विभागा अंतर्गत विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगलं राहण्यासाठी आरोग्यदायी शिबिर भरविण्यात आले. या |

| | | |
|---|---|---|
| | | शिबिरात विशेषतः व्यसनाधीन मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार देण्यात आले. |
| 8. | सहशालेय उपक्रम | विद्यार्थ्यांसाठी विविध सहशालेय उपक्रम आयोजित करण्यात आले त्या उपक्रमात व्यसनाधिनतेचा परिणाम याबाबत जाणीव जागृती करण्यात आली. जसे पोस्टर तयार करणे, घोषवाक्य, नाटक इत्यादी. |
| 9. | करिअर मार्गदर्शन शिबिर | विद्यार्थ्यांच्या करिअरला निश्चित दिशा मिळावी म्हणून विद्यार्थ्यांसाठी विविध स्वयंसेवी संस्था मार्फत करिअर संदर्भात मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. |
| 10. | क्रीडा स्पर्धांचे आयोजन | विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विविध क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. |
| 11. | मानसशास्त्रज्ञांचे व्याख्यान | विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. गरज असलेल्या विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. |



**सोशल मीडियाचा प्रभाव कमी करण्यासाठी- मार्गदर्शनपर कार्यशाळा**



s

**जीवन कौशल्य कार्यशाळा**

असे विविध उपक्रम शिक्षक व स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने राबवल्यामुळे मॅडमना शाळेमध्ये निश्चितच बदल दिसून आला. मुलांच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल दिसून आला.  जी मुलं सर्रासपणे मोबाईलचा शाळेमध्ये वापर करत होती, त्याचं प्रमाण अगदी नगण्य झाले. ई सिगारेट व नशा येणारे एनर्जी ड्रिंक पण आणण्याचे प्रमाण कमी झाले. विविध सभांना पालक नियमित उपस्थित राहू लागले व सक्रियपणे सभेत सहभाग घेऊ लागले. विद्यार्थ्यांची हिंसक प्रवृत्ती कमी झाली. शाळेमध्ये नियमित उपस्थित राहू लागले .अशाप्रकारे विविध मूल्याधिष्ठित,शैक्षणिक,सामाजिक उपक्रमांचा सकारात्मक परिणाम त्यांच्या एकूणच प्रगतीवर दिसून आला.

**चिंतनात्मक प्रश्न**

1. व्यसनाधीन मुलांसाठी काम करत असताना श्रीमती ठाकूर मॅडम आणि त्यांच्या शिक्षकांसमोर असलेल्या आव्हानांची यादी करा.
2. व्यसनाधीन मुलांच्या समायोजना बाबत काम करण्यासाठी कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते ?

**विचार करूया चर्चा करूया**

1. तुम्ही मुख्याध्यापक असलेल्या शाळेत काही व्यसनाधीन मुले शिक्षण घेत आहेत, त्या मुलांच्या हिंसक प्रवृत्तीमुळे दोन गटात मारामारी सुरू झाली आहे अशा परिस्थितीत तुम्ही मुख्याध्यापक म्हणून नेमक्या कोणत्या कृती कराल?
2. अनेक व्यसनाधीन मुले असलेल्या शाळेत तुमची मुख्याध्यापक म्हणून बदली झाली आहे अशा परिस्थितीत तुमची काम करण्याची पद्धती नेमकी कोणती असेल,मुद्देनिहाय लेखन करा.

**विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेच्या विळख्यातून बाहेर काढून शालेय समायोजन साधण्यासाठी शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक यांना असेही करता येईल :**

1. व्यसनाचे दुष्परिणाम व त्याचे स्वरूप समाजासमोर आणण्यासाठी शाळांमध्ये पथनाट्य, एकांकिका, पोस्टर्स, स्लोगन्स व इतर स्पर्धाचे आयोजन करावे.
2. शाळांमध्ये मद्यपानासह इतर व्यसनाच्या  दुष्परिणामांची चलचित्र किंवा चित्रफित तयार करून दाखविणे.
3. अंमली पदार्थ विरोधी दिन, तंबाखू विरोधी दिन, धूम्रपान विरोधी दिन, नशाबंदी दिवस तसेच सप्ताह पाळण्यात यावेत व अशा दिवशी शैक्षणिक संस्थांमधून प्रभात फेरी काढता येईल.
4. विद्यार्थ्यांना दवाखान्यात नेऊन किंवा डॉक्टरांचे व्याख्यान लावून व्यसनाच्या दुष्परिणामांची माहिती देता येईल.
5. नशा मुक्ती केंद्र व या संदर्भात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करता येईल.या संस्थांना विद्यार्थ्यांच्या भेटीचे आयोजन करता येईल
6. व्यसनाचे दुष्परिणामाबाबत शाळेतील उपक्रम व कार्यक्रमात पालकांचा सहभाग वाढविता येईल.

7. वर्षातून किमान दोनदा विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून घेऊन विद्यार्थी व पालक यांना आरोग्य तपासणीबाबत मिळालेले अहवालकळवता येतील .
8. विद्यार्थ्यांचे समायोजन होण्यासाठी विविध खेळ क्रीडा स्पर्धा यामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

**या मोड्यूलची शालेय नेतृत्व व शिक्षकांच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता :**

महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण शासन निर्णय दिनांक 17 ऑगस्ट 2011 नुसार भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद 47 मध्ये सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजना व्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याने सदरचे धोरण फक्त दारूबंदी पुरते सीमित न ठेवता तंबाखू, गुटखा, अफीम व समाज जीवनावर, सामाजिक स्वास्थ्यावर दुष्परिणाम करणाऱ्या इतर सर्व व्यसनांचा समावेश या धोरणात करण्यात आलेला आहे.

भारत हा एक विकसनशील देश असून, मनुष्यबळ ही त्याची संपत्ती आहे सदर मनुष्यबळातील युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती आहे. तथापि व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे राज्याच्या आणि राष्ट्राच्या युवाशक्तीचा ऱ्हास होत आहे. त्यामुळेच या धोरणाच्या अनुषंगाने शाळेतील मुलांना व्यसनमुक्त करणे हे महत्त्वाचे कार्य आहे. म्हणूनच या मोड्यूलचा उपयोग व्यसनाधीन विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या शालेय नेतृत्वाला व शिक्षकाला होणार आहे.

- महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण 2011 ची प्रभावी अंमलबजावणी.
- व्यसनाधीनता बाबत येणाऱ्या समस्यांचे विश्लेषण व त्यावर उपाययोजना.
- विद्यार्थ्यांची व्यसनाधीनता कमी करण्याकडे एक यशस्वी पाऊल.
- विद्यार्थ्यांची व्यसनाधीनता कमी होऊन त्यांना शालेय समायोजन साधण्याची संधी .

**समारोप**

समाजात अशा कितीतरी भेडसावणाऱ्या समस्या आहेत. पण त्यांचे स्वरूप वेगवेगळे असते. पण ती समस्या जर शारीरिक व मानसिक असेल तर त्याचे पडसाद संपूर्ण समाजावर मोठा प्रमाणावर उमटल्याशिवाय राहत नाही. व्यसनाधीनता ही त्यातील विकृत व मोठी समस्या होऊन बसलेली आहे. समाजात अगदी लहान मुलांपासून ते वयोवृद्ध माणसे सहजरित्या विविध व्यसन करताना दिसतात. हेच जर शाळेत घडायला लागले तर त्याचे दुष्परिणाम संपूर्ण पिढीवर झाल्याशिवाय राहत नाहीत. आज-काल मुले सहज म्हणून व्यसन करतात व त्या व्यसनाच्या खोल खोल विळख्यात अडकून जातात. अशा मुलांना त्या व्यसनातून बाहेर काढणे ही काळाची गरज आहे. हे लक्षात घेऊन शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांनी विविध स्वयंसेवी संस्था, नशा मुक्ती केंद्र, पोलीस यंत्रणा व समाजातील मदत करणारे काही घटक यांच्या साह्याने विद्यार्थ्यांचे समायोजन साधण्याचे काम करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांची व्यसनाच्या विळख्यातून सुटका करून शालेय समायोजन साधण्याचे काम मुख्याध्यापक श्रीमती ठाकूर व त्यांचे सहकारी शिक्षक करत आहेत . त्यांचे हे काम निश्चितच कौतुकास्पद आहे.

**संदर्भसूची**


1. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था मिपा औरंगाबाद

2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

3. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक: डीडीपी 2009/प्र. क्र.149/सुधार -1 दिनांक 27 ऑगस्ट 2011

Website

1. https://mr.vikaspedia.in/health/HlthOth_Info/

2.https://maharashtratimes.com/lifestyle-news/health-news/what-is addiction/ articleshow/

3. https://mr.wikipedia.org/wiki/

4. https://www.myupchar.com/mr/disease/drug-addiction

5. https://lokmat.news18.com/technology/social-media-addiction-in-youth-read-symptoms-causes-and-treatment-mhsa-

YouTube Link

https://www.youtube.com/watch?v=IsymMMDdnAc



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
|---|---|---|
| डॉ.प्रभा खरटमोल | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे. | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |